दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**वृत्तविशेष क्र.** 12 **दिनांक :** 8, **एप्रिल** 2019

## महापालिकेच्या सर्व उद्यानात आकर्षक विद्युत रोषणाई
## महापालिका आयुक्तांचा अभिनव उपक्रम

ठाणे(४): ठाण्याच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या उद्यानांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात २ कोटीची भरीव आर्थिक तरतूद करून पालिकेच्या सर्व उद्यानात आकर्षक एलईडी दिव्यांच्या खांब उभारणीची मोहीम महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी हाती घेतली असून महापलिकेच्या इतिहासात प्रथमच उद्यानाचे रूप या आकर्षक रोषणाई अधिक चमकदार दिसणार आहेत.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात महापालिकेच्या सर्व प्रभाग समिती अंतर्गत विविध उद्यानांमध्ये विद्युत रोषणाई करण्याच्या कामाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. यापैकी काही उद्यानातील विद्युत रोषणाईचे काम पूर्ण झाले असून काही उद्यानातील काम प्रगती पथावर आहे.तसेच काही कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

यापूर्वी उद्यानातील दिवे समाज कंटकाकडून तोडण्यात येण्याच्या घटनांची दखल घेवून नवीन दिवे लावत असताना योग्य ती दक्षता घेण्यात आली आहे. विशेष डिझाईन तसेच उद्यानांच्या हिरवाईला अनुरूप रंगसंगतीचे खांब लावण्यात येत आहेत. तसेच आकर्षक प्रकाश व्यवस्थेसाठी उर्जा कार्यक्षम एलईडी दिव्यांचा वापर करण्यात येत आहे.

या मोहिमेंतर्गत नुकतेच मुल्लाबाग येथील स्व. प्रमोद महाजन निसर्ग उद्यान, हिरानंदानी मेडोज येथील महापालिका उद्यान व इतर विविध उद्यानामध्ये विद्युत रोषणाईचे काम पूर्ण करण्यात आले आहे.